अ. १) **थोडक्यात परिचय**

वसई-विरार शहर महानगरपालिका (VVCMC) अंतर्गत सार्वजनिक उपयोगासाठी खालील नमूद जलतरण तलाव कार्यरत आहेत.

| अ.क्र. | स्विमिंग पूलचे नाव | ठिकाण |
|---|---|---|
| १. | फुलपाडा स्विमिंग पूल | विरार (पुर्व) |
| २. | ओम नगर स्विमिंग पूल | नवघर, वसई (पश्चिम) |
| ३. | तामतलाव स्विमिंग पूल | वसई (पश्चिम) |

या जलतरण तलावाचे प्रभावी व्यवस्थापन, नियमित देखभाल, स्वच्छता व सुरक्षिततेची हमी तसेच आर्थिक दृष्टया त्यांचा चांगला वापर सुनिश्चित करण्याच्या दृष्टीने, महानगरपालिकेने खाजगी संस्थांच्या सहभागातून नफा वाटप तत्त्वावर संचालन व देखभाल करण्याच्या निर्णय घेतलेला आहे. करीता स्वारस्य अभिव्यक्ती प्रस्ताव मागविण्यात येत आहेत.

अ. २) **स्वारस्य अभिव्यक्तीचे उद्दीष्ट :-**

एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्ट (EOI) च्या या आमंत्रणाचा उद्देश आहे.

१) जलतरण तलावाचे दररोजचे संचालन व व्यवस्थापन
२) तिकीट विक्री, प्रवेश नियंत्रण व महसूल संकलन
३) नियमित साफसफाई, क्लोरीनेशन व तांत्रिक देखभाल
४) लाईफगाड्‌र्स व प्रशिक्षित पोहण प्रशिक्षकांची नेमणूक
५) पोहण्याचे प्रशिक्षण वर्ग, स्पर्धा व जनसामान्यांसाठी उपक्रमांचे आयोजनास सहाय्य
६) महानगरपालिकेसोबत निश्चित व टक्केवारीने महसूल वाटप
७) सर्व कायदेशीर व आरोग्यविषयक नियमांचे पालन
८) सर्व उपकरणे संयत्रे कार्यान्वयीत ठेवणे व दुरुस्ती किंवा नव्याने बसविणे.
९) लाईट बील पाणी बील अदा करणे.

सदर स्वारस्य अभिव्यक्ती दस्तऐवज मध्ये कामाचे स्वरुप, कामाची व्याप्ती, पात्रता आवश्यकता, प्रपत्रे आणि इच्छुक सहभागींसाठी प्रस्ताव सादर करण्याची प्रक्रिया नमूद करण्यात येत आहे. निकषांची पूर्तता करणारे अर्ज केवळ मूल्यांकन केले जातील आणि निवड केलेले संस्थांना नियुक्त केले जाईल वसई विरार शहर महानगरपालिका कोणत्याही टप्प्यावर कोणत्याही किंवा सर्व प्रस्ताव स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार राखून ठेवते, प्रक्रियेचे कोणतेही कारण न देता आणि त्यावर कोणताही दावा/ प्रतिदावे स्वीकारले जाणार नाहीत.

अ. ३) **कामाची व्याप्ती :-**

१) **संचालन (Operation)**

१.१ महानगरपालिकेच्या मान्य वेळापत्रकानुसार तरण तलाव नियमितपणे नागरिकांसाठी सुरु ठेवणे.

१.२ शाळा, महाविद्यालये, क्रीडा संस्था व सर्वसामान्य नागरिक यांच्यासाठी जलतरण सुविधा उपलब्ध करून देणे.

१.३ प्रशिक्षित व पात्र जलतरण प्रशिक्षक (Swimming Coach), लाईफगार्ड व आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करणे.

१.४ प्रवेश शुल्क/ सदस्यता शुल्क संकलनासाठी तिकीटव्यवस्था व नोंदणी प्रणाली राबविणे (महानगरपालिकेच्या मान्यतेनुसार) त्यासाठी भविष्यातील अंदाजित ठेका रक्कम निश्चितीकरिता प्रमाणे पावतीपुस्तके वसई विरार शहर महानगरपालिका मार्फत देण्यात येतील व वेळोवेळी संस्थेचे रजिस्टर बँक खाती पडताळणी करता येईल.

२) **देखभाल व दुरुस्ती (Maintenance & Repairs) :-**

२.१. पाण्याचे नियमित फिल्ट्रेशन, क्लोरीनेशन व इतर आवश्यक ट्रीटमेंट करून दर्जा मानकांनुसार राखणे.

२.२. तलावातील पाणी पातळी,तापमान व गुणवत्ता यांचे नियतकालिक परीक्षण करणे.

२.३. बदलण्याची खोली,शॉवर, स्वच्छमागृह, लॉकर रूम व इतर सर्व सुविधा स्वच्छ व कार्यक्षम ठेवणे.

२.४. पंप, फिल्टर, इलेक्ट्रिकल, प्लंबिंग,टायलिंग, लाईटिंग व इतर यंत्रसामग्रीची नियमित तपासणी व दुरुस्ती करणे. आवश्यकता वाटल्यास नव्याने स्थापन करून करार कालावधी संपताना ज्या स्थितीत हस्तांतरित झाले त्या/चालू स्थितीत पुन्हा परत देण्यात यावेत.

२.५. आवश्यकता असल्यास रंगरंगोटी करणे.

३) **स्वच्छता व सुरक्षितता (Hygiene & safety) :-**

३.१. राष्ट्रीय व राज्य क्रीडा / आरोग्य विभागाने ठरविलेल्या पाणी गुणवत्तेच्या मानकांचे पालन करणे.

३.२. प्रत्येक सत्रादरम्यान प्रशिक्षित लाईफगार्ड व फर्स्ट-एड सुविधा उपलब्ध ठेवणे.

३.३. आपत्कालीन परिस्थितीसाठी (Emergency Response) आराखडा तयार ठेवणे व कर्मचारी प्रशिक्षित करणे.

३.४. तलाव परिसरात धूम्रपान, मद्यमान व अन्य धोकादायक कृतींवर बंदी घालून त्याचे पालन सुनिश्चित करणे.

३.५. प्रशिक्षित लाईफगार्डकडे मान्यताप्राप्त संस्थेकडून प्रशिक्षण घेतले असल्याबाबतचा दाखला आवश्यक असेल.

४) **आर्थिक बाबी (Financial Arrangements)** :-

४.१. सर्व फी, शुल्क यांचे नियम पारदर्शकपणे जाहिर करून त्यास वसई-विरार शहर महानगरपालिका कडील मान्यता आवश्यक.

४.२. सर्व महसूल संकलनाची पारदर्शक नोंद ठेवणे.

४.३. ठरलेल्या टक्केवारीनुसार/ पदधतीनुसार महसूलातील महानगरपालिकेचा वाटा वेळेवर जमा करणे.

४.४. महानगरपालिकेला मासिक व त्रैमासिक आर्थिक अहवाल सादर करणे.

४.५. पावतीपुस्तके महानगरपालिकेने प्रमाणित करून तयार केलेल्या वितरित कराव्या.

४.६. सर्व प्रकारचे खर्च उदा. इलेक्ट्रीक, प्रशिक्षण,पाण्याचे शुध्दीकरण, पाणी पुरवठा इ. सर्व बाबी संबंधितांनी करणे.

५) **प्रचार व जनतागृती (Promotion & Public Engagement) :-**

५.१. जलतरण वर्ग,स्पर्धा, जलक्रीडा कार्यक्रम आयोजित करून नागरिकांचा सहभाग वाढविणे.

५.२. स्थानिक शाळा,महाविद्यालये व क्रीडा संघटनांशी सहयोग करणे. सदर जलतरण तलाव हे सार्वजनिक मालमत्ता असून तेथे लोकांना समानतेची वागणूक मिळणे अनिवार्य आवश्यक महानगरपालिकेच्या मान्यतेच्या नियमानुसार त्याचे परिचालन करणे आवश्यक आहे.

६) **कायदेशीर व प्रशासकीय पालन (Legal & Administrative Compliance) :-**

६.१. सर्व आवश्यक परवाने, परवाना नूतनीकरण, विमा पॉलिसी व कामगार कायदयाचे पालन करणे.

६.२. महानगरपालिकेच्या सर्व सूचनांचे पालन करणे व आवश्यक अहवाल वेळोवळी सादर करणे.

६.३. जलतरण तलावमध्ये पोहणारे व्यक्ती यांची सुरक्षा व अपघात घडल्यास त्याबाबत कायदेशीर जबाबदारी ही संस्थेची राहील. यासाठी पुरेसे प्रतिबंधात्मक उपाय व खबरदारी घेण्यात यावी. करारनाम्यावर तसे मान्य करावे.

अ ४) **निवड पध्दत :-**

१) प्राप्त झालेल्या EOI चे मूल्यमापन करून लघु-सूची (Shortlist) तयार केली जाईल.
२) लघुसूचीत आलेल्या एजन्सींना तपशीलवार आर.एफ.पी (Request for Proposal) मागविण्यात येईल.
३) पात्र संस्थांकडून बोली द्वारे अंतिम एजन्सीची निवड केली जाईल.

अ. ५) **पात्रता निकष :-**

१) सार्वजनिक जलतरण तलाव किंवा तत्सम सुविधा चालविण्याचा किमान २ वर्षांचा अनुभव.
२) कमीतकमी २ सार्वजनिक जलतरण तलाव (Swimming Pool) संचालनाचा अनुभव.
३) वैध नोंदणी प्रमाणपत्रे (Firm Registration) GST,PAN,Shop Act).
४) उपलब्ध कर्मचारी व प्रशिक्षकांची यादी व अनुभव प्रमाणपत्रे.
५) मागील तीन वर्षाचे आयकर प्रमाणपत्र आवश्यक.
६) मागील तीन वर्षाचे उलाढाल (Turn over) निविदा रकमेच्या ५०% असणे अनिवार्य राहील. तसेच C.A. कडून प्रमाणपत्राची आवश्यकता अनिवार्य. या आधारे सादर कागदपत्रे व कामाचे नियोजनाकरिता विसृत प्रकल्प अहवाल सादर करण्यात यावा.

अ. ६) **मूल्यमापन निकष :-**

अर्जदार संस्था ज्यांनी पूर्व पात्रता निकष पूर्ण केले आहेत त्यांचे मुल्यमापन, तांत्रिक मूल्यमापन निविदा समिती द्वारे करण्यात येईल.

अ. ७) **सहभागी निविदाकारांनी महापालिकेने कळविलेले वेळी खालील मुदयांचे आधारे आपले सादरीकरण (PPT) सादर करावे व निविदेचे अटी आधारे मुल्यमापन करून संस्थांना आर्थिक बोली करिता पात्र ठरविण्यात येईल**

| अ.क्र. | निकष | गुण |
|---|---|---|
| १ | अनुभव व पात्रता (समान प्रकारच्या प्रकल्पांतील कार्यानुभव) | ३० |
| २ | आर्थिक स्थैर्य व उलाढाल | २० |
| ३ | प्रस्तावित संचालन आराखडा व देखभाल योजना | २० |
| ४ | सादरीकरण (P.P.T) | २० |
| ५ | सामाजिक उपक्रम, प्रचार योजना व नागरिक सहभाग | १० |
| | **एकूण** | **१००** |

निवड होण्यासाठी, सहभागीला किमान ५० गुण मिळणे आवश्यक आहे (अट शिथिल करण्याचे सर्व अधिकार निविदा समिती कडे राहतील).

ब) सहभाग घेणाऱ्या संस्थाना सूचना

आर्थिक बोली पात्र संस्था पुढील लिलावाच्या बोलीकरिता पात्र ठरविण्यात येईल.

ब.१) **स्वाक्षरीदार अधिकृत (AUTHORIZED SIGNATURE) :-**

EOI स्वारस्य अभिरुची चे अर्ज सादर करताना सादरकर्ता हा त्या संस्थेचा अधिकृत स्वाक्षरीदार असावा तसेच सर्व दस्तावेज व प्रमाणपत्रे हे अधिकृत स्वाक्षरीदार यानेच प्रमाणित करून पाठवाव्यात. संपूर्ण पत्र व्यवहार हा संस्थेकडून होताना हा अधिकृत स्वाक्षरीदार मार्फतच स्वीकारला जाईल.

ब.२) **स्वारस्य अभिरुची सादर करणे (SUBMISSION OF EOI) :-**

सदर स्वारस्य अभिरुची वसई विरार शहर महानगरपालिका यांच्या संकेत स्थळ https://vvcmc.in वर सदर दस्तावेज उपलब्ध असेल तरी सर्व नमूद केलेले कागदपत्रे प्रपत्र, दस्तावेज, प्रमाणपत्र, वसई विरार शहर महानगरपालिका, मुख्यालय येथे टपालाने, स्वहस्ते सादर करावेत.

ब.३ **स्वारस्य अभिव्यक्ती (EOI) सोबत लागणारी कागदपत्रे :-**

स्वारस्य अभिरुची (EOI) दाखल करणाऱ्या संस्थांनी खालील प्रमाणे कागदपत्रे जोडावीत.

१ अधिकृतता पत्र (Letter of Authorization)

२) प्रपत्र १ प्रस्तावाचा नमुना प्रपत्र

३) प्रपत्र २ पूर्व-पात्रता निकष (Pre-Qualification Criteria)

४) प्रपत्र ३ सार्वजनिक जलतरण तलाव चालविण्याच्या अनुभवाचा तपशील

५) प्रपत्र ४ सहभागींबद्दल तपशील

६) प्रपत्र ५ प्रतिज्ञापत्र किंवा स्व-घोषणा

७) मूल्यमापन निकषांनुसार अतिरिक्त समर्थन करणारे दस्तऐवज अथवा कागदपत्रे.

८) मागिल तीन वर्षाचे प्राप्तीकर विवरण (ITR Returns), ताळेबंद विवरण (Account And Balance Sheet)

९) इतर कोणतीही माहिती अर्जदाराला त्यांचे दावे सिद्ध करण्यासाठी सादर करावयाचे असल्यास सोबत जोडावेत.

स्वारस्य अभिरुची चे सर्व दस्तावेज हे क्रीडा विभाग, वसई विरार शहर महानगरपालिका, मुख्यालय येथे टपालाने, स्वहस्ते सादर करावेत.

ब. ४) **स्वारस्य अभिव्यक्ती (EOI) मध्येसुधारणा :-**

स्वारस्य अभिव्यक्ती मध्ये स्वता:हून अथवा संस्थे मार्फत काही तृटी निदर्शनास आल्यास सदर स्वारस्य अभिव्यक्ती मध्ये सुधारणा करण्याचे संपूर्ण अधिकार हे वसई विरार शहर महानगरपालिका राखून ठेवीत आहे. तसेच अर्ज सादर करण्याची शेवटची तारीख बदलण्याचे संपूर्ण अधिकार हे अवधित राहतील.

ब.५) **तांत्रिक मुल्यमापण :-**

१) वसई विरार शहर महानगरपालिका आलेल्या सर्व अर्जाची छाननी करेल.

२) सदर अर्जामध्ये काही त्रुटी असतील पण त्या सदर कार्यक्रम राबविण्याकरिता अति महत्वाच्या बाबी नसल्यास त्या त्रुटी दुर्लक्षित करण्याचे संपूर्ण अधिकार निविदा समितीस राहतील.

३) अर्जदारंचे मुल्यांकन हे उपलब्ध माहिती नुसार केले जाईल. तरी जर अधिक स्पष्टीकरण लागणार असेल तर तसे मागविण्याचे संपूर्ण अधिकार निविदा समितीकडे राहतील.

ब.६) **अर्जाचे मूल्यमापन :-**

अर्जाच्या मूल्यांकनाची प्रक्रिया खाली दर्शविली आहे.

१) स्वायत अभिरुची (EOI) मध्ये पूर्व-पात्रता निकष निर्दिष्ट केले आहेत त्या प्रमाणे अर्जदाराने प्रस्तावित कागदपत्रे त्याच क्रमाने सादर करावेत.

२) केवळ सहभागी, जे पूर्व पात्रता निकष पूर्ण करतात, त्यांचे नमूद केलेल्या मूल्यमापन निकषांनुसार निवडीसाठी मूल्यांकन केले जाईल.

३) मुल्यमापनात किमान ५० गुण मिळवणाऱ्या सहभार्गीना शॉर्ट लिस्टिंगसाठी विचारात घेतले जाईल. तसेच सदर अट शिथिल करण्याचे सर्व अधिकार निविदा समितीकडे राहतील.

ब.७) **स्वारस्य अभिव्यक्ती (EOI) नाकारणे, :-**

अर्ज नाकारला जाण्यास खालील कारणाने केले जाईलः

अ) अर्ज विहित नमुन्यात नाही आणि त्यात सर्व आवश्यक तपशील नाहीत.

ब) देय तारीख आणि वेळ संपल्यानंतर प्राप्त होणारे अर्ज

क) स्वायत अभिव्यक्ती (EOI) सोबत योग्य सहाय्यक कागदपत्रे नाहीत.

ब. ८) **अस्वीकरण (disclaimer)** :-

सदर अर्ज केवळ Online www.vvcmc.in या संकेतस्थळावर (Website) सादर करावे. वसई विरार शहर महानगरपालिका कोणत्याही अर्जाच्या उशीरा प्राप्तीसाठी जबाबदार राहणार नाही. उशिरा प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

ब.९) **प्रस्तावित अटी व शर्ती पुढील प्रमाणे-**

१) **जवाबदारी (Responsibilities)**:-

- पूल-व परिसराची स्वच्छता, देखभाल व दुरुस्ती.
- पाण्याची गुणवत्ता आणि नियमित क्लोरीनेशन/फिल्ट्रेशन सुनिश्चित करणे.
- सुरक्षेची पूर्णतः खबरदारी (लाइफ गार्ड, CCTVs, आपत्कालीन साधने).
- वेळापत्रकानुसार पूल उघडणे/बंद करणे.
- महिला व पुरुषांसाठी स्वतंत्र कपडे बदलण्याची सोय, स्वच्छतागृहे, इ.

२) **शुल्क निर्धारण (Fee Structure)**:-

- सदस्यता व नोंदणी शुल्क महानगरपालिकेच्या मंजुरीनंतरच आकारले जाईल.
- कोणतेही शुल्क वाढविण्यासाठी महानगरपालिकेची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक.

३) **महानगरपालिकेचे हक्क (Rights of VVMC)**:-

- कोणत्याही वेळी तपासणी/ऑडिट करण्याचा हक्क राखून ठेवला जाईल.
- नियमभंग झाल्यास करार रद्द करण्याचा हक्क पालिकेकडे राहील.
- जाहिरात व इतर व्यावसायिक उपयोगासाठी स्वतंत्र परवानगी आवश्यक.

- कोणत्याही वेळी तपासणी/ऑडिट करण्याचा हक्क राखून ठेवला जाईल.
- नियमभंग झाल्यास करार रद्द करण्याचा हक्क पालिकेकडे राहील.
- जाहिरात व इतर व्यावसायिक उपयोगासाठी स्वतंत्र परवानगी आवश्यक.

४) **विमा (Insurance):-**

- अपघात घटनांसाठी वैयक्तिक विमा योजना लागू करणे आवश्यक.
- *कोणत्याही अपघाताची पूर्ण जवाबदारी नियुक्त होणाऱ्या ठेकेदाराची/संस्थेची राहील.*

५) **आर्थिक अटी (Financial Terms):-**

- तिमाही/वार्षिक ठेका रक्कम (पालिकेने निश्चित केलेली) आगाऊ स्वरुपात वेळेत भरावी लागेल.
- निवड झालेल्या संस्था/एजन्सीने करारावर स्वाक्षरी करण्यापूर्वी महानगरपालिकेकडे राष्ट्रीयकृत/शॅडयुल बँकेची बँक गॅरंटी सादर करणे बंधनकारक राहील.
- बँक गॅरंटी रक्कम ही वार्षिक करार मूल्याच्या २५% अथवा महानगरपालिकेने निश्चित केलेल्या रक्कमेइतकी राहील.

६) **इतर नियमः-**

- पालिकेच्या धोरणानुसार सामाजिक वर्ग (जसे की विद्यार्थी, दिव्यांग, ज्येष्ठ नागरिक) यांना सवलती लागू शकतात.
- पूलमध्ये ध्वनिप्रदूषण, अल्कोहोल किंवा धुम्रपानास मनाई असेल.

(सही/-)
वसई विरार शहर महानगरपालिका

## प्रपत्र १

## स्वारस्य अभिरुचीच्या प्रस्तावाचा नमुना

प्रति,

मा. आयुक्त,
वसई विरार शहर महानगरपालिका.
मुख्यालय, विरार (प.)

विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील जलतरण तलावांचे संचालन व देखभाल नफा वाटप तत्त्वावर करण्याकरिता स्वारस्य अभिव्यक्ती सादर करणे बाबत.

महोदय,

उपरोक्त विषयानुसार, खाली स्वाक्षरी केलेल्यांनी स्वारस्य अभिव्यक्ती (EOI) संबंधित सर्व दस्तऐवजांचे तपशीलवार वाचन आणि परीक्षण केले आहे तसेच तुमच्या कार्यक्षेत्रात निर्दिष्ट कार्यक्रमासाठी काम करण्यासाठी याद्वारे स्वारस्य व्यक्त करत आहोत.

| अ.क्र. | वर्णन | शेरा |
|---|---|---|
| १ | सहभागी संस्थेचे नाव | |
| २ | पत्ता | |
| ३ | व्यक्तीचे नाव, पद आणि पत्ता (Authorized Signature) | |
| ४ | दूरध्वनी क्रमांक | |
| ५ | मोबाइल क्रमांक (संपर्क व्यक्ती) | |
| ६ | ई-मेल आयडी संस्थेचा | |
| ७ | 7 ई-मेल आयडी (संपर्क प्रमुख) | |

मी/आम्ही खालील प्रमाने कागदपत्रे सोबत जोडले आहेत.

१. अधिकृतता पत्र. (Letter of Authorisation)

२. संस्थेच्या लेटर हेडवर योग्य रित्या सीलबंद आणि अधिकृत व्यक्तीने स्वाक्षरी केलेला अर्ज (प्रपत्र १)

३. पूर्व-पात्रता पात्रता निकष (प्रपत्र २).

४. सार्वजनिक जलतरण तलाव चालवण्याचा अनुभव (प्रपत्र ३)

५. अर्जदाराबद्दल तपशील (प्रपत्र ४)

६. प्रतिज्ञापत्र/स्व-घोषणा (प्रपत्र ५)

७. आवश्यक कागदपत्रांच्या स्व-प्रमाणित प्रती (Attested Copy Of Supporting Documents).

८. मागील तीन वर्षाचे प्राप्तीकर विवरण (ITR returns), ताळेबंद विवरण (Account And Balance sheet).

मी/आम्ही याद्वारे घोषित करतो की माझा/आमचा स्वायत अभिव्यक्ती (EOI) सद्भावनेने केला आहे आणि त्यात असलेली माहिती हि खरी आहे.

आपला विश्वासू

सही

पद

शिक्का

दिनांक

## प्रपत्र २
## पूर्व-पात्रता निकष

| अ.क्र. | विवरण | शेरा |
|---|---|---|
| १ | अर्जदार नोंदणीकृत सार्वजनिक/खाजगी मर्यादित कंपनी, भागीदारी १ संस्था, सहकारी संस्था किंवा नोंदणीकृत ट्रस्ट/NGO - आहे /नाही | |
| २ | वैध GST नोंदणी, PAN क्रमांक व लागू असलेले सर्व परवाने असावेत. | |
| ३ | किमान ३ वर्षांचा अनुभव क्रीडा सुविधा / जलतरण तलाव /जलक्रीडा केंद्र / फिटनेस सुविधा यांच्या संचालन व देखभाली बाबतचे अनुभव प्रमाण पत्र. | |
| ४ | अशा प्रकारच्या किमान २ प्रकल्पांचे यशस्वी पूर्णत्व प्रमाणपत्र (Work Completion Certificate) | |
| ५ | मागील ३ आर्थिक वर्षांपैकी कोणत्याही 2 वर्षात वार्षिक उलाढाल रु.२५ लाखांपेक्षा जास्त असले बाबतचे पत्र | |
| ६ | मागील ३ वर्षांचे ऑडिटेड बॅलन्स शीट / CA प्रमाणित आर्थिक अहवाल आवश्यक. | |
| ७ | प्रशिक्षित व प्रमाणित Swimming Coach व लाईफगार्ड नियुक्त करण्याची क्षमता | |
| ८ | आवश्यक सुरक्षा व देखभाल कर्मचारी उपलब्ध ठेवण्याची खात्री द्यावी. | |
| ९ | संस्था कुठल्याही राज्यात काळ्या यादीत नलसल्याबाबत हमीपत्र. | |
| १० | संस्था वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीत कार्यरत असल्यास तपशीलवार माहिती. | |

**अर्जदाराची स्वाक्षरी**

## प्रपत्र ३

## सार्वजनिक जलतरण तलाव चालवण्याच्या अनुभावाचे तपशील

सार्वजनिक जलतरण तलाव चालवण्याच्या अनुभवाचे तपशील आणि पूर्ण झालेल्या / हातात असलेल्या प्रकल्पांची माहिती.

| अ.क्र. | उपक्रम राबिविणाऱ्या स्वायत संस्थेचे नाव (Name Of Hiring Authority) | स्वायत संस्थेचा पत्ता व संपर्क तपशील | कामाचे स्वरुप | उपक्रम चालू केल्याची दिनांक | उपक्रम समाप्त केल्याची दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

**अर्जदाराची स्वाक्षरी**

टीप :-

कृपया लक्षात घ्या कामावर घेणाऱ्या प्राधिकरणाकडून कार्यारंभ आदेश (वर्क ऑर्डर) सादर करणे आवश्यक आहे.

## प्रपत्र ४
## सहभागी स्वयं सेवी संस्था बद्दल तपशील

| | |
|---|---|
| स्वयंसेवी सेस्थेचे नाव | |
| कामाचा अनुभव | |
| कार्यालयाची पत्ता | |
| इतर अनुषंगिक माहिती | |
| इतर आवश्यक दस्तावेज<br><br>१)<br><br>२)<br><br>३) | |

**अर्जदाराची स्वाक्षरी**

**प्रपत्र ५**
**शपथपत्र किंवा**
**स्व-घोषणा**

**संदर्भः- स्वारस्य अभिव्यक्ती वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील जलतरण तलावांचे संचालन व देखभाल नफा वाटप तत्त्वावर करण्याकरिता स्वारस्य अभिव्यक्ती सादर करणे बाबत.**

निवड प्रक्रियेत सहभागी होण्यापासून वगळण्यात येईल जर,

१) संस्था किंवा संस्था चालक दिवाळखोरी झाली असल्यास, अथवा न्यायालीन प्रकरणात कर्ज देणाऱ्या सोबत सामंजस्य / अथवा सेटलमेंट झाली असल्यास.

२) त्यांच्या व्यावसायिक वर्तनाशी संबंधित गुन्ह्यासाठी दोषी ठरविण्यात आले आहे, असे कुठलेही न्यायिक प्रकरण.

३) कोणत्याही मार्गाने सिद्ध झालेल्या गंभीर व्यावसायिक गैरवर्तनासाठी दोषी आहेत, जे करार प्राधिकरण न्याय ठरवू शकते.

४) भ्रष्टाचार, आणि गुन्हेगारी संघटना किंवा इतर कोणत्याही बेकायदेशीर घटकापासून सहभाग समुदायांच्या आर्थिकहित संबंध असल्यास

५) ह्या आधी इतर प्राधिकरणा सोबत करार केल्या नंतर करार पूर्ण न करताच करार मोडला असल्यास.

६) कुठलाही राजकीय दबाव आणल्यास तुमच्या स्वारस्याच्या अभिव्यक्तीच्या आव्हानाला प्रतिसाद म्हणून, मी/आम्ही याद्वारे घोषित करतो की,

- मी/आम्ही मला/आम्हाला वरील पैकी कुठलीही परीस्थिती लागू होत नाही.
- मी/आम्ही व्यवसायातील सर्वोच्च नैतिक मानकांचे पालन करण्यास सहमत आहोत आणि विशेषतः हितसंबंधांचा कोणताही संभाव्य संघर्ष नाही (CONFLICT OF INTEREST)
- स्वायत अभिव्यक्ती (EOI) प्रक्रियेदरम्यान किंवा अंमलबजावणी दरम्यान कोणत्याही टप्यावर वरीलमध्ये काही बदल आढळल्यास मी/आम्ही प्राधिकरणाला ताबडतोब कळवेन.
- मी/आम्ही पूर्णपणे ओळखतो आणि स्वीकारतो कि, कोणतीही चुकीची किंवा अपूर्ण माहिती जाणून बुजून दिलेली असल्यास स्वायत अभिव्यक्ती (EOI) अर्ज नाकारण्यात येऊ शकतो.

(अर्जदाराची किंवा संस्थेच्या अधिकृत प्रतिनिधीची स्वाक्षरी,स्टॅम्प/सीलसह)

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
मुख्य कार्यालय, विरार
यशवंत नगर,विरार (प.),
ता.वसई, पालघर - ४०१ ३०३.

दूरध्वनी क्र.:०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६
फॅक्स : ०२५०-२५२५१०७
ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com
जावक क्र.: व.वि.श.म.क्रीडा/ /२०२६-२७
दिनांक : / /२०२६.

विषय :- वसई - विरार शहर महानगरपालिका अंतर्गत जलतरण तलावाचे दैनिक व्यवस्थापन करणेबाबत.

| अ.क्र. | तरणतलावाचे नाव | निश्चित बोली रक्कम (वार्षिक) |
|---|---|---|
| १. | फुलपाडा तरणतलाव, विरार (पुर्व) | रु. ३५,००,०००/- |
| २. | तामतलाव तरणतलाव, वसई गांव | रु. ३५,००,०००/- |
| ३. | अंबाडी तरणतलाव, वसई (पश्चिम) | रु. २५,००,०००/- |

(सही)/-
(अजित मुठे )
उपायुक्त क्रीडा
वसई विरार शहर महानगरपालिका

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
मुख्य कार्यालय, विरार
यशवंत नगर, विरार (प.),
ता.वसई, पालघर - ४०१ ३०३.

दूरध्वनी क्र.:०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६
फॅक्स : ०२५०-२५२५१०७
ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com
जावक क्र.: व.वि.श.म.क्रिडा/३३५ /२०२६-२७
दिनांक : २३ /०७ /२०२६.

फेर निविदा
(प्रथम वेळ)

## स्वारस्याची अभिरुची

## (EOI-EXPRESSION OF INTEREST)

वसई विरार शहर महानगरपालिका (VVCMC) अंतर्गत सार्वजनिक उपयोगासाठी प्रभाग समिती-सी, चंदनसार, प्रभाग समिती-एच, नवघर-माणिकपूर व प्रभाग समिती-आय वसई येथिल जलतरण तलाव कार्यरत आहेत. या तलावांचे प्रभावी व्यवस्थापन, नियमित देखभाल, स्वच्छता व सुरक्षिततेची हमी तसेच आर्थिकदृष्ट्या त्यांचा चांगला वापर सुनिश्चित करण्याच्या दृष्टीने, महानगरपालिकेने खाजगी संस्थांच्या सहभागातून ना-नफा ना-तोटा तत्त्वावर संचालन व देखभाल करण्याचा निर्णय घेतलेला आहे. तरी जलतरण तलावांच्या संचालन व देखभालीसाठी सन २०२६-२७, २०२७-२८ व २०२८-२९ या तीन आर्थिक वर्षासाठी नमूद केलेल्या अटी व शर्तीस अधीन राहून स्वारस्याची अभिरुची प्रस्ताव (EOI) / इ-लीलाव (E- Auction) मागविण्यात येत आहेत. अनुभवी संस्थांना प्रथम प्राधान्य देण्यात येईल.

तरी याबाबत अनुभवी व इच्छुक संस्थानी दि. /०७/२०२६ पर्यंत mahatenders.gov.in वर online अर्ज सादर करावेत. अर्जाचा नमुना, प्रपत्र १ ते प्रपत्र ५ वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या www.vvcmc.in या Website वर उपलब्ध आहेत.

| | |
|---|---|
| स्वारस्याची अभिरुची चे प्रकाशन | दि.२४/०७/२०२६, सकाळी ११.०० वाजे पासून ते दि.३१/०७/२०२६ . दुपारी ३.०० वाजेपर्यंत |
| स्वारस्याची अभिरुची चे कागदपत्र छाननी | दि.०३/०८/२०२६, सकाळी ११.०० वाजता |
| निविदा पुर्व बैठक | दि.५ / ८ /२०२६ |
| पुर्व पात्रता निकष पूर्ण करणाऱ्या स्वारस्याची अभिरुचीतील पात्र संस्थेचे सादरीकरण | स्वतंत्रपणे कळविण्यात येईल. |
| स्वारस्याची अभिरुचीतील पात्र संस्थेची निवड व घोषणा | स्वतंत्रपणे कळविण्यात येईल. |

| कामाचे नाव | फॉर्म फी | इसारा रक्कम रुपये | सुरक्षा अनामत रक्कम |
|---|---|---|---|
| प्रभाग समिती-सी, चंदनसार, प्रभाग समिती-एच, नवघर-माणिकपूर व प्रभाग समिती-आय वसई येथिल जलतरण तलावांचे प्रभावी व्यवस्थापन, नियमित देखभाल, स्वच्छता व सुरक्षिततेच्या व्यवस्थापन करण्याबाबत. | रु.३०००/- + १८% GST | रु. १५,०००/- | रु.५०,०००/- |

( अजित मुठे )
उप-आयुक्त (क्रीडा)
वसई-विरार शहर महानगरपालिका